**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,**
**नागपूर विभागीय शिक्षण मंडळ,नागपूर**
**M.S.BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION,**
**NAGPUR DIVISIONAL BOARD ,NAGPUR**

दूरध्वनी क्रमांक ;EPBX 0712-2565403 /2560209 /2553401 /2553360 FAX NO.0712-2561775
विभागीय अध्यक्ष : 2560319 /2562766 विभागीय सचिव : 2560319/2560166
ई मेल—msboardnagpur@gmail.com

# प्रकटन

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त
कनिष्ठ महाविद्यालये,
नागपूर विभाग, नागपूर

विषयः—उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ 12 वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) फेब्रु/मार्च 2019 च्या परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन नावनोंदणी अर्जाबाबत

संदर्भः— महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे पत्र क्र. रा. मं./परीक्षा—3/3809. दिनांकः— 19/07/2018.

उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, फेब्रु/मार्च 2019 उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ 12 वी व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इ.10 वी च्या परीक्षेत खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन नावनोंदणी अर्जाबाबत कार्यवाही दि. 30/07/2018 पासून सुरू करण्यात येत असून सदरील अर्ज मंडळाच्या संकेत स्थळावरून भरावयाच्या आहेत.कृपया सदर प्रकटनास विनामुल्य प्रसिध्दी देऊन सहकार्य करावे.

1) इयत्ता 10 वी व इयत्ता 12 वी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखा खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | **नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी तारखा** | **तपशील** |
|---|---|---|
| 1 | सोमवार. दि 30/07/2018 ते शनिवार. दि. 25/08/2018 | विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन भरणे. |
| 2 | मंगळवार दि.31/07/2018 ते सोमवार. दि.27/08/2018 | विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, विहित शुल्क व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जमा करणे |
| 3 | शुक्रवार. दि.31/08/2018 | संपर्क केंद्र शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, विहित शुल्क व मूळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे. |